नियमीत दिवाणी दावा क्रं.१३०/१९९७ मधील निशाणी क्रं.२२५ चे कोर्ट कमिशनर नियुक्तीबाबतचे अर्जावरील आदेश

(CNR No.:- MHKO070000541997 )

( भास्कर कांबळे वि. मारुती कांबळे )

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दाखल केला असुन असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.४ यांनी दाखल केलेल्या नि.२०९ च्या अर्जावरील सुनावणीच्यावेळी प्रतिवादी यांच्या मिळकतीची पुरात पडलेली भिंत ही सि.स.नं.१५८० मध्ये येते किंवा सि.स.नं.१५८१ मध्ये येते याविषयी वाद निर्माण झालेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे सदरची भिंत ही सि.स.नं.१५८१ ची असून ती सि.स.नं.१५८० च्या निटोप्याने आहे. तथापी आता त्याबद्दल प्रतिवादी यांनी वाद केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांच्या बांधकामाचे निश्चीत स्थान भूमी अभिलेख कार्यालयाच्या मोजणी मधून निश्चीत होणार आहे व सदर मोजणीस प्रतिवादी क्र.४ यांच्या विधीज्ञांनी सुध्दा संमती दर्शवलेली आहे. तरी सहाय्यक अधिक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ यांच्याकडून सि.स.नं.१५८० ची मोजणी करुन प्रतिवादी क्र.४ यांची पडलेली भिंत ही नकाशासह सि.स.नं.१५८० मध्ये येते किंवा कसे याबाबत मोजणी करणेत यावी. सदर मोजणीकामी येणा-या खर्चापैकी निम्मा खर्च वादी हे भरण्यास तयार असून उर्वरित निम्मा खर्च हा प्रतिवादी यांच्याकडून भरुन घेणेत यावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे नि.क्र.२२७ कडे दाखल केले असून असे कथन केलेले आहे की, प्रस्तुत अर्जामधील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादी यांचे बांधकाम सि.स.नं.१५८१ मध्ये येते कि सि.स.नं.१५८० मध्ये येते याबाबतची खात्री करुन घेणेसाठी कोर्ट कमीशनची मागणी केलेली आहे. मुळात सि.स.नं.१५८१ ची मिळकत ही यातील प्रतिवादी क्र. ४ व ५ यांची समाईकातील येण्याजाण्याचा बोळ रस्ता आहे व त्यामध्ये केंव्हाही व कधीही सिटी सर्व्हेचा

अमल झालेल्या तारखेपासून आजपर्यंत बांधकाम नव्हते व नाही. तसेच प्रतिवादींनी बांधकाम केलेले घर हे सि.स.नं.१५८० या मिळकतीमध्ये आहे. परंतू सदर मिळकतीमध्ये बांधकाम केलेले क्षेत्र ही दावा मिळकत नाही. नि.क्र.२०९ च्या सुनावणीच्या वेळी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये फक्त सि.स.नं.१५८० या मिळकतीची मोजणी करुन पडलेली भिंत कोणत्या सि.स.नं. मध्ये येते याची खात्री करुन करण्यासाठी मोजणी करुन घेण्याचे ठरलेले होते त्याशिवाय अन्य बांधकामाच्या मोजणीबाबत काहीही ठरलेले नव्हते. त्यामुळे प्रस्तुत वादी हे न्यायालयाचा वापर करुन अन्य पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करत आहेत. प्रस्तुत प्रतिवादी यांची पडलेली भिंत ही कोणत्या सिटी सर्व्हे नंबरमध्ये आहे याची खात्री करण्यासाठी मा.भुमि अभिलेख, शिरोळ यांची नेमणूक करण्याबाबत प्रस्तुत प्रतिवादी यांची हरकत नसून प्रस्तुत प्रतिवादी हे सदरहू मोजणी कामी येणा-या खर्चाचा निम्मा खर्च जमा करणेस तयार आहेत, असे कथन केलेले आहे.

०३. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञाचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी हक्कज्ञापन व वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जातील कथनावरुन वादी यांनी प्रतिवादी यांचे पडलेले घर हे सि.स.नं.१५८१ मध्ये येत असून सदरहू घराची भिंत ही सि.स.नं.१५८० च्या निटोप्यात असलेचे कथन केलेले आहे. याउलट प्रतिवादी क्र.४ यांनी सदरची बाब नाकारुन त्यांचे घर हे सि.स.नं.१५८० मध्ये असल्याचे कथन करुन सि.स.नं.१५८१ मध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम नसून सि.स.नं.१५८१ ही मिळकत प्रतिवादी क्र.४ व ५ यांची समाईकातील येण्याजाण्याचा बोळ रस्ता असून तेथे कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम नाही असे कथन केलेले आहे. अशा परिस्थीतीत वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनांचा विचार करता प्रतिवादी क्र.४ यांचे घराचे बांधकाम हे नक्की सि.स नं.१५८० मध्ये आहे किंवा सि.स.नं.१५८१ मध्ये आहे ही बाब न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. सदरची बाब ही केवळ सहाय्यक भूमी अधिक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ यांच्या मोजणीमधूनच न्यायालयासमोर येणार आहे. त्यामुळे, वादी व प्रतिवादी यांच्यामधील खराखुरा वाद निर्णित काढीत असताना त्याची मदत होणार आहे. सबब, वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे गरजेचे वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज (नि.२२५) मंजूर करण्यात येतो. |
| २. | उपअधिक्षक, भूमि अभिलेख, शिरोळ अथवा त्यांच्या तर्फे सक्षम अधिकारी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते. |
| ३. | न्यायालयीन आयुक्तांना असे आदेशित करण्यात येते की, मौजे नांदणी, ता.शिरोळ, जिल्हा कोल्हापूर येथील दावा मिळकत गट नं.१५८० व १५८१ या मिळकतींची प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन वस्तुस्थितीप्रमाणे मोजणी करावी आणि नकाशा तयार करुन त्याबाबतचा अहवाल न्यायालयात सादर करावा. |
| ४. | न्यायालयीन आयुक्तांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी वर नमुद दावा मिळकतीच्या वस्तुस्थितीची पाहणी उभयपक्षाच्या समक्ष करावी आणि त्याबाबतचा अहवाल कमिशन पत्र मिळाल्यापासून लवकरात लवकर दयावा. |
| ५. | वादी व प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी आवश्यक त्या फी चा खर्च निम्मा निम्मा परस्पर संबंधीत कार्यालयात भरुन याकामी त्याची पावती दाखल करावी. |
| ६. | उभय पक्षाकारांना असे आदेशित करण्यात येते की, न्यायालयीन आयुक्तांना संबंधित कागदपत्रांचा आवश्यक तो पुरवठा करावा. |
| ७. | येणेप्रमाणे कमिशन रिट पाठवावे. |

Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2021.03.19 15:20:29 +0530

( विश्वास पां.शिंदे )
दि.०१/०३/२०२१. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, जयसिंगपूर.